जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर.

ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in

'' प्रेस नोट '' **दि. १५/०६/२०२६**

मोटर सायकल चोरी करणा-या सराईत गुन्हेगाराच्या टोळीस अटक ,एकुण आठ मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघड, सुमारे नऊ लाख रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत, कासारवडवली पोलीस ठाण्याची कामगिरी

कासारवडवली पोलीस ठाणेच्या हद्दीतुन मागील २ महीण्यांचे यांचे कालावधीत हिरानंदानी इस्टेट परिसरातुन रोडचे बाजुला पार्क केलेल्या रॉयल इनफील्ड हंटर बुलेट व सुझुकी बर्गमॅन या मॉडेलच्या मो/सा विशेषकरून चोरी होत असल्याने सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत मा. श्री आशुतोष डुंबरे सो पोलीस आयुक्त ठाणे, डॉ. श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस सह आयुक्त ठाणे, श्री. अशोक दुधे, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशीक विभाग, ठाणे यांनी मोटार वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणणे व प्रतिबंध करण्यातबाबत आदेशीत केलेले आहे. त्या अनुषंगाने श्री. प्रशांत कदम पोलीस उपआयुक्त परिमंडळ ५, व श्री. मंदार जवळे सहा. पोलीस आयुक्त, वर्तकनगर विभाग यांनी सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या.

मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी कासारवडवली पोलीस ठाण्याचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळ, आरोपी येणे जाणेचे मार्ग- हिरानंदानी इस्टेट, घोडबंदर रोड, मिरारोड, दहीसर, कांदीवली, अंधेरी, सांताकुझ या परिसरातील सुमारे १२० सिसिटिव्ही कॅमेरे फुटेज चेक करून आरोपीत हे दहीसर कांदीवली परिसरातील असल्याचे निष्पण केले होते, त्या परिसरातील गोपनीय बातमीदार यांचे मदतीने विशेष प्रयत्न चालु असतांना दिनांक ०७/०५/२०२६ रोजी तपास पथकातील पोलीस अंमलदार मनोज सकपाळ यांना कासारवडवली पोलीस ठाणे गु. र.नं २८६/२०२६ या गुन्हयातील सुझुकी बर्गमॅन मो सा ही सांताकुझ मुंबई येथे विकी करण्यासाठी येणार असलेची खात्रीलायक बातमी मिळाल्याने पोउनि नितीन हांगे, पोह सकपाळ यांनी स्थानिक सांताकुझ पोलीस ठाणेच्या अंमलदार यांचे मदतीने आरोपीत **१) सोहेल अब्दुल शेख, वय २१ वर्षे , रा. शंभु शेठ चाळ, राजीवनगर, सांताकुझ (प), मुंबई. यांस सापळा लावुन ताब्यात घेतले, नमुद गुन्हयात त्यास अटक करून त्याचेकडुन मो /सा हस्तगत करून ३ मो/ सा चोरीचे गुन्हे उघडकीस आणले.**

नमुद आरोपीकडे केलेल्या तपासामध्ये मो/सा चोरी करण्या-या टोळीचा **मुख्य सुत्रधार मिलींद मनोहर सावंत रा. कांदीवली मुंबई** हा असल्याचे निष्पण झाल्याने त्याचा मिरारोड, मुंबई, कणकवली, वेंगुर्ले, देवगड, बंगलोर इत्यादी ठिकाणी शोध घेतला. दिनांक ०९/०६/२०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक नितीन हांगे यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीवरून त्यास दहीसर मुंबई येथे सापळा लावुन ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. तपासादरम्यान त्याने त्याचा साथीदार भुषण दिगंबर पुरी उर्फ राम गोस्वामी रा. नालासोपारा याचेसह कासारवडली ,पोलीस ठाणेतील ९ मोटारसायकल चोरी केल्याचे कबुली दिल्याने नमुद आरोपीस नालासोपारा येथे सापळा लावुन अटक करण्यात आली. दोन्ही आरोपीस दिनांक १५/०६/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

अटक आरोपीतांचे नाव पत्ता-

१) मिलींद मनोहर सावंत, वय ३० वर्षे, रा. ११४, रेणुका बिल्डींग, रेणुकानगर, वारकोप कांदिवली (प) मुंबई
२) भुषण दिगंबर पुरी उर्फ राम गोस्वामी, वय ४६ वर्षे, रा. श्रेया वसतिगृह, नालासोपारा (प) जि. पालघर
३) सोहेल अब्दुल शेख वय २१ वर्षे , राह. शंभु शेठ चाळ, राजीवनगर, सांताकुझ (प) मुंबई.

गुन्हे करण्याची पध्दत:-

आरोपीत मिलींद सावंत व भुषन पुरी हे हिरानंदानी इस्टेट परिसरातील रोडचे बाजुस हॅन्डल लॉक न करता पार्क केलेल्या बर्गमन व हंटर बुलेट मोटार सायकल हेरून त्या थोडया अंतरावर ढकलत नेवुन वायर कटरने मोटार सायकलची मेन स्वीचची वायर कट करून त्याच्याकडे असलेले इलेक्ट्रीक फ्युज मोटार सायकलला लावुन मोटार सायकल चालू करून चोरी करीत होते. त्यानंतर त्या मोटार सायकल मिरारोड रेल्वे जवळील परिसरात ३/४ दिवस पार्क करून ठेवत असे दरम्यान मोटार सायकलचा शोध घेत कोणी न आल्याची खात्री पटल्यावर कार ट्रेड एक्सचेंज या ॲप्लीकेशनवर चोरी केलेल्या मो/सा च्या मिळती जुळती वर्णनाची मो/सा नंबर घेवुन एम परिवहन या ॲप्लीकेशनवरून त्या नंबरचा तपशील प्राप्त करून त्याप्रमाणे आर सी बुक व इतर माहीती डाऊनलोड करून त्यातील माहीतीप्रमाणे बनावट नंबरप्लेट बनवत असे. त्यानंतर चोरी केलेल्या मो/सा ची फोटो इतर माहीती सह ॲपवर विक्रीसाठी अपलोड करत असे, बुलेट हंटर मो/सा सुमारे एक ते सव्वा लाख व बर्गमॅन सत्तर ते ऐंशी हजार रूपयांस विक्री करतात, विक्री केलेल्या ग्राहकांना काही दिवसांत मो/सा चे नोंदणी करून देवु असे आश्वासन देवुन नंतर मोबाईल नंबर बंद करून त्यांची फसवणुक केली आहे.

कासारवडवली पोलीस ठाणे कडील उघडकीस आलेले ०८ मो/सा चोरीचे गुन्हे व हस्तगत मोटार सायकलची माहीती.

अ.	गुन्हा रजीस्टर नंबर व कलम	मोटार सायकलचा तपशील
१	१७२/२०२६ भा.न्या.सं. क. ३०३(२)	१,६२,०००/- रू. रॉयल इन्फील्ड हंटर मो/सा. MH-04 MX-8847
२	१०७४/२०२५ भा.न्या.सं. क.३०३(२)	१,२०,०००/- रू. रॉयल इन्फील्ड हंटर मो/सा MH-20-GN-7572
३	२२०/२०२६ भा.न्या.सं. क. ३०३(२)	१,००,०००/- रू. रॉयल इन्फील्ड हंटर मो/साMH-18-CC-3599
४.	२८६/२०२६ भा.न्या.सं. क.३०३(२)	१,०५,०००/- रू. सुझुकी बर्गमॅन मो/सा MH- 03-EY-5932
५	२५३/२०२६ भा.न्या.सं. क. ३०३(२)	५०,०००/- रू.सुजूकी बर्गमॅन मो/सा MH- 04-MJ-2567
६	३२२/२०२६ भा.न्या.सं. क.३०३(२)	७०,०००/- रू. सुजुकी बर्गमन मो/सा MH-09-GS-5345
७	२९५/२०२६ भा.न्या.सं. क. ३०३(२)	७०,०००/- रू.सुजूकी बर्गमॅन मो/सा MH-47-BQ-2864
८	२००/२०२६ भा.न्या.सं. क. ३०३(२)	४०,०००/- रू. सुजूकी बर्गमॅन मो/सा MH-04-KK-1954

आता पर्यंतचे तपासामध्ये नमुद आरोपीतांकडुन ८ मो/सा, ६ मोबाईल फोन, एक टॅब, १४ सिमकार्ड, इलेक्ट्रीक फ्युज **इतर साहीत्य सुमारे असा सुमारे ०९ लाख रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगस्त करण्यात आला आहे, असुन अधिक तपास चालु असुन मो/सा चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.**

मिलींद मनोहर सावंत हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी मुंबई, ठाणे परिसरातुन सुमारे ७० पेक्षा जास्त मोटारसायकल चोरी व इतर गुन्हे नोंद आहेत, त्यास गुन्हे प्रकटीकरण कक्ष ९, मुंबई यांनी अटक करून मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणले होते, सदर गुन्हयामध्ये आरोपीस मा.न्यायालयाने शिक्षा सुनावली होती.

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्री. प्रशांत कदम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०५, श्री मंदार जवळे सहाय्यक पोलीस आयुक्त, वर्तकनगर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली कासारवडवली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. निवृत्ती कोल्हटकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/मनिष पोटे, पोउपनि/ नितीन हांगे, श्रेणी पोउपनिरी/सुनिल सुर्यवंशी, पोलीस अंमलदार मनोज सकपाळ, जगदीश पवार, रविंद्र रावते, गोरखनाथ काळे, शरद माळी, संदिप तुपे, किशोर माळी, काळुराम साठे यांनी केली आहे.

नागरीकांना अवाहन करण्यात येते की, त्यांनी आपली वाहने व्यवस्थीत लॉक करून अधिकृत पार्कींग, सुरक्षीत ठिकाणी लावावीत.

----------oooooo----------